माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.२२२०८०/२२/अ.क्र. ४७०६ /२५**

श्री. साईराज मुदिराज
४०, श्री साई, पवननगर, मालेगांव,
रोड, तरोडा (खु.) नांदेड-४३१६०५.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-२०),नगर विकास विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव कक्ष अधिकारी (नवि-२०),
नगर विकास विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०१.२०२६</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३१.०१.२०२२ | १०.०२.२०२२ | २३.०३.२०२२ | २९.०४.२०२२ |

प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी श्री.साईराज मुदिराज यांनी दिनांक २९/०४/२०२२ रोजी तत्कालीन अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाविरुद्ध द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आढळून येतो.

प्रस्तुत अपिलीय आदेशात अर्जदारांनी अपेक्षिलेल्या माहितीबाबत म्हणजेच नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी अधिकारी/ कर्मचारी यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावावर, झालेल्या कार्यवाहीच्या नस्तीमधील सर्व कागदपत्रांच्या प्रती मिळण्याबाबत असून सदर धारिका ही अपिल आदेश पारित केला तेव्हा कार्यवाही सुरू असल्याचे नमूद करीत नगर विकास-२० कार्यसनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल असे सुचित करण्यात आले.

उपरोक्त प्रकरणी शासनाने दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी आयुक्त नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका यांना या आधीच महानगरपालिकेतील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना त्यांच्या १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर तीन लाभांच्या सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करण्याकरता शासनाच्या वित्त विभागाने दिनांक ०२ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, त्यानुसार

jyotsna

विहित केलेली कार्यपद्धती तसेच महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेऊन नियमोचित कार्यवाही आपल्या स्तरावर करण्याच्या सूचना निर्गमित केल्या असून या संदर्भात दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजी संबंधित महानगरपालिकेकडून प्राप्त प्रस्तावावर घेतलेला निर्णय हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या स्त्रोतामधून करण्यात येत असल्याने त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्यासंदर्भात त्यांना सुचित करण्यात आले असल्याचे या पत्रांन्वये आढळून येते.

या पत्राची एक प्रत ही या आधीच अपिलार्थींना प्रदान केली असून शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाची प्रत ही महानगरपालिका तसेच अपीलार्थींना प्रदान केली असल्याची वस्तूस्थिती लक्षात घेता प्रस्तुत द्वितील अपिल अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०६-०१-२०२६**

State Information Commission Maharashtra

jyotsna